म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा-वा-
दा.क्र. ५२५५
बालवा
५३५५५
IRBK-0105355
IRBK-0105355

२५५२८
२०१३।५०

# चंद्रबळ

[ मुलांमुलींसाठीं चार अंकी छोटें नाटक ]

शशिकला आळंदकर

४३५५
IRBK-0105355

केशव भिकाजी ढवळे
गिरगांव, मुंबई

मूल्य आठ आणे

मुलांमुलींसाठीं लिहिलेल्या ' चंद्रबळ ' नाटकांत
श्री. वसंतराव व सौ. कमलाबाई
ह्या दोन भूमिकांसाठीं अध्यापकवर्गांनीं
किंवा पालकांनीं पुढें व्हावें अशी अपेक्षा आहे.

' चंद्रबळ ' नाटकाचा प्रयोग रंगभूमीवर करण्यापूर्वीं
किंवा प्रयोगाच्या दृष्टीनें
तसाच कांहीं फेरफार करावयाचा झाल्यास
लेखिकेची लेखी परवानगी घेणें आवश्यक आहे.

लेखिकेचा पत्ता :
शशिकला आळंद्कर
श्रीदत्त मंदिर, हजारे वाडी,
कॅडेल रोड, माहीम, मुंबई १६

पहिली आवृत्ति
दत्तजयंती, २८ डिसेंबर, १९५५

मुद्रक : वा. ग. ढवळे,
कर्नाटक मुद्रणालय, चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक : के. भि. ढवळे,
कर्नाटक हाउस, चिराबाजार, मुंबई २

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

अनुक्रम २६६२७
विभाग बा. व
क्रमांक २५३
नों. दि. १९।३।६

# अंक पहिला

[ डॉक्टर देसाई ह्यांचा दिवाणखाना. पांचसहा मुलें आणि तीन-चार मुली शांतपणें बसल्या असून मध्यभागीं खुर्ची-टेबल ठेवलें आहे. टेबलावर पाण्याचें भांडें व फुलदाणी आहे. एकंदर थाट सभेचा असून अध्यक्षस्थानीं त्या घरचा छोटा मालक कुमार चंद्रकान्त देसाई ऊर्फ चंदू ह्याची निवड झाली आहे. एका बाजूला लहानशा स्टुलावर 'पेंद्या' दैनिकाचा बातमीदार विद्याधर शेटे गंभीरपणें कागद पेन्सिल घेऊन बसला आहे. त्यानें गळ्यांत कॅमेरा अडकवलेला असून अधूनमधून मनगटाला नाक पुसण्याची त्याला खोड आहे. कांहीं लहान मुलें सभेच्या कामांत प्रत्यक्ष भाग न घेतां निमूटपणें बसलीं आहेत. पडदा वर जातो तेव्हां नुकताच पास झालेला ठराव नं. २ वाचून दाखविण्यासाठीं अशोक कुळकर्णी ऊर्फ बंडू पुढें येतो. ]

**बंडू :** अध्यक्षमहाराज आणि बंधुभगिनींनो, आतां मी आपणांपुढें पास झालेला ठराँव नंबर दोन ....

**मनी :** (मध्येंच) डराँव म्हणजे काय ?

**चंदू :** डराँव नव्हे .... ठराव.

**मनी :** जरा नीट वाचायला सांगा. नाहींतर 'पेंद्या' दैनिकाचे बातमीदार डराँव लिहून घेतील.

**बंडू :** सभेच्या कामांत अडथळा आणूं नका. नीट कान द्या. (एक दोन मुलें कानांना हात लावतात) ठराव नं. २. कुमार चंद्रकान्त देसाई ह्यांच्या पपाममांचं ....

**मंदा :** (मध्येंच) आईवडलांचं म्हणा.

**बंड्ू :** (जीभ पटकन् चावून) चुकलं! देसाई ह्यांच्या आईवडलांचं ही सभा जाहीर अभिनंदन करीत आहे; स्वयंपाकघरासह अख्ख्या घराचा पूर्ण ताबा देऊन चंदू–चुकलं–चंद्रकान्त ह्यांच्या आईवडलांनीं जें धाडस दाखवलं....

**मनी :** (मध्येंच) धाडस नव्हे धैर्य.

**बंड्ू :** (तिच्याकडे रागानें पाहात) जें धैर्य दाखवलं तें फार फार प्रशं.... प्रशं.... प्रशंवसनीय आहे. (सुटकेचा निःश्वास टाकून रुमालानें तोंड पुसतो.)

**बातमीदार :** पण तो शब्द लिहायचा कसा?

**मंदा :** कोणता शब्द?

**बातमीदार :** तो शेवटच्या आधींचा. तो तो मोठा शब्द.

**चंदू :** (चिडून) एकदा सांगितलं ना तुला–चुकलं–तुम्हांला, जो शब्द लिहितां येत नसेल ती जागा कोरी ठेवा. मी नंतर लिहून देईन.

**बंड्ू :** त्याचप्रमाणें इतर पालकांनींही आपल्या मुलांवर पूर्ण विश्वास टाकून गांवाला निघून जावं अशी आमची त्यांना आग्रहाची विनंती आहे.

**मनी :** (उठून) दहींदुभत्याच्या कपाटाला कुलूप न लावतां निघून जावं अशी ठरावांत सुधारणा करावी.

**बंड्ू :** अगदींच मनी आहेस बघ.

**मनी :** आणि तूं? तूं रानबोका.

**चंदू :** शूः! भांडूं नका. खालीं बसा. (दोघें खालीं बसतात.)

**अजित :** (उठून रडव्या स्वरांत) पण चंदूच्या सोबतीला त्याचा महाराज आहे. जंबू कुत्रा आहे. पण आमच्या घरीं स्वयंपाकी नाहीं आणि कुत्रा पण नाहीं. एकटं कसं घरांत राहायचं?

बंडू : ( वेडावून दाखवीत ) एहेरे रड्या ! भित्री भागूबाई.

मनी : अरे मी येईन तुझ्या सोबतीला.

अजित : ( खालीं बसत ) हं. मग हरकत नाहीं.

चंदू : ( टेबलावर जोरानें मूठ आपटून ) हं चला. ठराव पास झाल्याबद्दल टाळ्या वाजवा.

बातमीदार : नुसत्या टाळ्या नको. हसायला पण सांगा.

बंडू : तें कशाला ?

मंदा : इश्श ! हा का सिनेमा आहे उगाचच हसायला-रडायला ?

बातमीदार : हसलांत तर आमच्या 'पेंद्या' दैनिकांत हशा आणि टाळ्यांसह आजच्या सभेचा वृ.... वृ.... नकोच तें.... आजच्या सभेची बातमी छापतां येईल.

बंडू : बरं चला. हशा आणि टाळ्या.

[ सर्व मुलें जोरजोरानें टाळ्या वाजवून हसूं लागतात. अखेरीस टेबलावर दोन्ही हातांच्या मुठी आपटून चंदू त्यांना गप्प बसवतो.]

चंदू : आतां तिसरा ठराव श्री. विनोद राजे आपणांपुढें ठेवतील.

छबी : अय्या ! तो काय पेढ्यांचा पुडा आहे समोर ठेवायला ?

बंडू : शूः ! अध्यक्षांची चूक काढायची नसते.

[ विनोद शर्टची कॉलर नीट करून, केस मुद्दाम विसकटून पुढें येतो. ]

मंदा : इश्श ! मुद्दाम केस विसकटलेन्.

मनी : अग ती अलीकडची पद्धत आहे.

विनोद : ( वाचूं लागतो ) ठराव नं. ३. निदान थंडीच्या दिवसांत तरी आम्हां मुलांच्या कपभर दुधांत दोन-चार चमचे चहाचें पाणी मिसळावें अशी आमची वडील मंडळीस विनंती आहे. आमच्या विनंतीकडे काणाडोळा केल्यास ....

**बातमीदार :** म्हणजे कसा ?

**बंडू :** ( डोळा तिरळा करून ) हा असा.

**विनोद :** काणाडोळा केल्यास आमचं शिष्टमंडळ थेट गवळ्याकडे जाईल.

**मंदा :** अहो मिस्टर विनोद, हा सातारा नाहीं. ही मुंबई आहे. इथें कुठले गवळी ? दूधवाल्या भय्याकडे अशी सुधारणा करा.

**विनोद :** ( ठरावांत बदल करीत ) बरं तसं होऊं द्या. तर आमचं शिष्टमंडळ थेट भय्याकडे जाऊन दुधांत चहाचं पाणी मिसळण्याची विनंती करील. तिथेंही डच्चू मिळाला तर ....

**अजित :** ( मध्येंच ) हा डच्चू शब्द बरा दिसत नाहीं.

**बातमीदार :** आणि मला लिहितां पण येत नाहीं.

**अजित :** त्याऐवजीं अपयश हा शब्द वापरावा.

**बंडू :** हॅट ! ही काय नेपोलियन बोनापार्टी लढाई आहे अपयश यायला !

**मंदा :** तर मग तिथेंही टपली मिळाली तर असं लिहावं.

**मनी :** डच्चूची बहीण टपली. त्यापेक्षां काय बरं लिहावं ? छे ! सुचत नाहीं.

**बंडू :** जाऊं दे. आतां उशीर नको. सभेचा वेळ वायां जातो आहे.

**मनी :** चाळींतल्या नळाचं पाणी वायां जात असतं. वेळ फुकट जात असतो बंडोपंत.

**चंदू :** शूः ! उगाच वाद नको. त्या शब्दाच्या ठिकाणीं दोनचार फुल्या करून ठेवा. योग्य शब्द आठवला कीं तिथें घालूं.

**विनोद :** (वाचूं लागतो.) तर मग .... तिथेंही दोनचार फुल्या मिळाली .... नव्हे मिळाल्या तर आम्ही दुधावर भविष्कार ....

**मंदा :** बहिष्कार टाकूं.

**अजित :** ( रडव्या स्वरांत ) पण सकाळीं भूक लागली तर ?

**बंडू :** तर पी लेका नळाचं पाणी.

**चंदू :** ( टेबलावर मूठ आपटून ) आजच्या आपल्या सार्वजनिक सभेंत असले शब्द वापरण्याची बंदी आहे.

**मनी :** सिनेमांत विडी ओढण्याची बंदी असते तशी ?

**बंडू :** एवढ्याचसाठीं मीं काल सूचना केली होती कीं आपल्या सभेस बायकांना येण्याची बंदी करावी. त्यांच्यामुळें सभेच्या कामांत .... सभेच्या कामांत .... काय बरं येतो ....

**अजित :** अव्यय येतो.

**मंदा :** अव्यय नव्हे .... व्यत्यय .... नव्हे नव्हे .... आपलं असंच कांहींतरी.

**चंदू :** बरं चला. पुढें चला. सभेचं काम लवकर आपटून ....

**मनी :** आपटून नव्हे आटपून.

**चंदू :** मला गच्चीवर गोष्टी सांगायला जायचं आहे.

**बंडू :** चला पुढें व्हा. आगे बढो.

[ मनी सुरावर गाऊं लागते. अजित तिला साथ करतो. ]

**मनी–अजित :** कदम कदम बढाये जा, खुशी के गीत गाये जा, कदम कदम बढाये जा, खुशी के गीत गाये जा ....

**चंदू :** ( मोठ्यानें ) शूः ! चूप बसा. आजची ही सभा राष्ट्रीय नसून घरगुती आहे.

**बंडू :** आपलीं दुःखं वेशीवर टांगण्यासाठीं भरली आहे.

**मनी :** पण आपल्या मुंबईंत वेस कुठें आहे ?

**मंदा :** वा ग शहाणे ! गेट वे ऑफ इंडिया नाहीं वाटतं ?

**चंदू :** आतां मध्येंच बोलाल तर बाहेर घालवून देण्यांत येईल.

**मंदा :** आम्ही मुळींच जाणार नाहीं.

**मनी :** चांगली दोन पैसे वर्गणी दिली आहे आम्हीं तुमच्या सभेसाठीं.

**अजित :** रेझरना सांगा ह्यांचे पैसे परत द्यायला.

**मंदा :** रेझर नव्हे ट्रेझरर. एहेरे शहाण्या !

**चंदू :** बंधुभगिनींनो, आतां आपण चौथ्या ठरावाकडे वळून बघूं या. (दोन तीन मुलें मागें वळून पाहातात.) हा ठराव नं. ४ आपले सेक्रेटरी श्रीयुत अजितराव माने वाचून दाखवतील.

**अजित :** (भीत भीत पुढें येतो. सर्वांना नमस्कार करीत) मित्रहो, आतां चौथा....

**मनी :** (मध्येंच) आणि आम्ही ?

**चंदू :** मैत्रिणींनो म्हणा अजितराव.

**अजित :** छट् !

**मंदा :** छट् काय ! आम्हांला हाक मार नाहींतर आम्ही मोठ्यानें बोलायला, भांडायला, गायला सुरुवात करूं. चल ग मने, हो पुढें ....

[मनी गाऊ लागते. दुसऱ्या मुली तिला साथ करूं लागतात. चंदू त्यांना गप्प बसविण्याचा प्रयत्न करतो पण मुली त्याचें न ऐकतां गाऊं लागतात. बातमीदार मध्येंच उठून गाणाऱ्या मुलींचा फोटो घेतो. दुसरीं मुलें कानांवर हात ठेवून स्वस्थ बसतात.]

अक्कण माती चिक्कण माती खळगा जो खणावा ।
अस्सा खळगा सुरेख बाई जातं तें रोवावं ।
अस्स जातं सुरेख बाई सपीऽऽठ दळावं ।
अस्स सपीठ सुरेख बाई करंज्या कराव्या ।
अश्शा करंज्या सुरेख बाई तबऽऽकीं ठेवाव्या ।
अस्सं तबक सुरेख बाई शेल्यानं झाकावं ।
अस्सा शेला सुरेख बाई पालखीं ठेवावा ।
अश्शी पालखी सुरेख बाई माहेरीं धाडावी ।
अस्सं माहेर सुरेख बाई खायाला मिळतं ।
अस्सं आजोळ सुरेख बाई खेळाया मिळतं ।
अस्सं सासर द्वाड बाई कोंडोनी मारीतं ।

बंडू : झालं ? संपलं तुमचं किंचाळणं ? पुढच्या वेळीं तुमच्याकडून वर्गणी घ्यायची नाहीं आणि तुम्हांला सभेला पण येऊं द्यायचं नाहीं.

चंदू : चला अजितराव. तुमचा ठराव मांडा.

अजित : हा चौथा ठराव फारच महत्त्वाचा असून आपल्या मनाला भिजवणारा आहे.

मनी : भिजवणारा ? म्हणजे ?

चंदू : भिजवणारा नव्हे खिजवणारा.

अजित : हो हो खिजवणारा. बरं पुढें .... आमचीं नांवं बाराव्या दिवशीं ठेवलीं.

मंदा : बारशाच्या दिवशीं अशी सुधारणा करा.

अजित : आमचीं नांवं बारशाच्या दिवशीं ठेवलीं आहेत तीं आम्हांला मान्य नसून त्याबद्दल आम्ही तीव्र नापसंती व्यक्त करीत आहोंत.

[ सर्वजण जोरजोरानें टाळ्या वाजवतात. ]

बातमीदार : नुसत्या टाळ्या नकोत .... हसा. हशा आणि टाळ्या.

चंदू : ह्या वेळीं हसलां नाहींत तरी चालेल. हा ठराव फार गंभीर आहे.

[ सर्वजण गंभीर चेहेरे करून बसतात. ]

अजित : आतां आम्ही असा ठराव मांडीत आहोंत कीं आमचीं म्हणजे लहान मुलांचीं नांवं त्यांना विचारून ठेवलीं जावींत.

मंदा : एहेरे शहाण्या !

चंदू : शूः ! अजितराव माने म्हण.

मंदा : अहो श्रीयुत माने, म्हटलं बाराव्या दिवशीं मुलांना बोलतां येत नाहीं.

चंदू : अरे खरंच कीं. हा मुद्दा विचारांत घेण्यासारखा आहे.

बंडू : ( उठून ) तर मग असा ठराव मांडूं या कीं लग्नांत ज्याप्रमाणें मुलींचीं नांवं बदलतात त्याप्रमाणें मुंजींत आम्हांला विचारून आमचीं नांवं ठेवलीं जावींत.

चंदू : आणि सणासुदीला तीं नांवं बाहेर न काढतां रोज वापरलीं जावींत.

मनी : हो, पण आम्हीं काय करायचं ? आमची थोडीच मुंज होते तुम्हां मुलांसारखी ?

बंडू : हो, तेंही खरंच. आतां ह्या प्रसंगांतून बिकट मार्ग शोधून काढला पाहिजे.

मंदा : बिकट प्रसंगांतून मार्ग म्हणा कुळकर्णीआप्पा.

मनी : सोनार शिंपी कुळकर्णीआप्पा, तिघांची संगत नको रे बाप्पा !

बंडू : तर मग हो चालती इथून.

मनी : तूंच हो चालता.

चंदू : आतां जर भांडाल तर ह्या भांड्यांतलं पाणीच तुमच्या डोक्यावर ओतण्यांत येईल.

अजित : मी एक सूचना करूं ?

चंदू : विचारतोस काय ? हं चल. बोल झटपट.

अजित : हें पाहा बायांनो ....

मनी–मंदा : ( किंचाळतात ) बायांनो ?

छबी : आणि तुम्ही कोण ? बुवांनो ?

मनी : सरळ भगिनींनो म्हण.

अजित : ( घाबरून ) नकोच तें. मी आपला अध्यक्षांच्या कानांत सांगतों.

[ चंदूच्या कानांत सांगून अजित खालीं बसतो. ]

चंदू : ( उठून ) हें पाहा भगिनींनो, श्री. अजितरावांचं म्हणणं असं आहे कीं लग्नांत मुलींचीं नांवं बदलतात तेव्हां बारशाला कसलंही नांव ठेवण्यास हरकत नाहीं.

अनुक्रम १५१२७
विभाग बा.वा.
क्रमांक ८९३
नों. दि. २२।३।५७

**मनी :** हरकत तुमची नसेल पण आमची आहे.

**मंदा :** माझी आहे.

**छबी :** माझी आहे.

**मंदा :** मी मुळीं लग्नच करणार नाहीं.

**छबी :** मी .... हो .... मी .... हो .... मी देखील करणार नाहीं.

**मनी :** मी लग्न करणार आहें पण तोंपर्यंत हें असं मांजरीसारखं 'मनी मने' म्हणवून घेणं मला मुळींच पसंत नाहीं.

**बंडू :** खरंच, तुझं पाळण्यांतलं नांव काय आहे ग ?

**मनी :** ( मोठ्या रुबाबांत ) मृणालिनी.

**चंदू :** छान नांव आहे.

**बातमीदार :** ( नाक पुशीत ) फार अवघड आहे.

**अजित :** आणि मोठं पण आहे. दोन किंवा फार तर तीन अक्षरांपेक्षां मोठं नांव ठेवूं नये असा आपण ठराव मांडूं या.

**बंडू :** अरे बाबा, तरी आपली सुटका नाहीं. माझं नांव आहे अशोक. साधं, सुटसुटीत. पण काय उपयोग ?

**मनी :** कांहीं म्हण, पण अशोकपेक्षां बंड्या नांवच तुला अधिक शोभतं.

**बंडू :** ( चिडून ) तर मग मृणालिनीपेक्षां मनी नांवालाच तूं रूपानें आणि गुणानें अधिक योग्य आहेस.

**मंदा :** माझं नांव चांगलं मंदाकिनी आहे. पण सारीं मला मंदा म्हणतात.

**चंदू :** अग नशीब समज. 'किनी–काणी' म्हणत नाहींत !

**बातमीदार :** तुमच्या सर्वांहून माझं नशीब वाईट आहे. माझं नांव कसं छान आहे.

**बंडू :** काय रे नांव तुझं ?

**बातमीदार :** अं. अवघड आहे.

**मनी :** त्याचं नांव आहे विद्याधर पण त्याला सगळीं मुलीप्रमाणें 'विदू' म्हणून हाक मारतात.

**छबी :** माझं नांव आहे शुभांगी. पण सगळीं मला छबी म्हणतात.

**चंदू :** बाकी मला विचाराल तर चंद्रकान्तपेक्षां चंदू नांवच मला अधिक आवडतं बुवा.

**मंदा :** हो आणि उद्यां तुला कुणी कान्त–कान्ता म्हणूं लागलं तर ?

**चंदू :** बापरे ! बंड्या ... चुकलं .... घसरलं .... अशोककुमार, कसंही करून आपण हा ठराव पास केलाच पाहिजे.

**बंडू :** आणि मोठीं माणसं तो हटकून नापास करतील.

[ इतक्यांत पाटील वकिलांचा बारा-तेरा वर्षांचा नोकर विठू चिठ्ठी घेऊन येतो. ]

**विठू :** साहेब घरांत हायती ?

**मंदा :** घरांत नाहींती.

**अजित :** इस कोचावर गाव हाय नव्ह, तिथ गेल्याती.

**चंदू :** हें असं एखाद्याला चिडवणं आपल्यासारख्या शाळेंत जाणाऱ्या मुलांना शोभत नाहीं. ( विठूला ) काय रे, काय काम आहे ?

**विठू :** चिट्टी आणलीया नव्ह !

**चंदू :** आण इकडे.

**विठू :** मालक म्हणाल्याती, साहेबास्नी चिटी दाकव.

**मंदा :** अरे आज हाच साहेब आहे.

**मनी :** ह्या घरचा मालक आहे.

**विठू :** ह्यो मालक. ( हसूं लागतो. )

**चंदू :** ( चिडून ) हसायला काय झालं? आण ती चिठ्ठी इकडे आणि हें बघ रोज सकाळीं माकड छाप दंतमंजनानें दांत घासत जा.

चंदू : आणि मग हसत जा.

[ चंदू चिठ्ठी वाचूं लागतो. ]

अजित : काय रे, नांव काय तुझं ?

विठू : इटू.

मंदा : इटू नव्हे विठू.

छबी : विठू नव्हे विठ्ठल.

विठू : व्हय व्हय त्येच नव्ह का ?

चंदू : तुला तुझं नांव आवडतं का रे ?

विठू : मंजे ?

अजित : इटू नांव तुला पसंत आहे का ?

विठू : माझ्या बाला इचारा.

मंदा : अरे, बाप नाहीं कांहीं मुलाचं नांव ठेवीत.

छबी : आई नांव ठेवते.

मनी : आई नाहीं कांहीं नांव ठेवत. आत्या नांव ठेवते.

विठू : मंग तिला इचारा.

मनी : कुठें आहे रे तुझी आत्या ?

विठू : मरूनशान जालीं नव्ह चार वर्सं ?

चंदू : हत् मूर्खा ?

[ विठू हसत निघून जातो. ]

अजित : कुणाची चिठ्ठी आहे रे ?

चंदू : पाटील वकिलांची.

मनी : पाटलांनीं पाटीलकी करावी. वकिली करूं नये.

चंदू : शहाणी आहेस फार.

मनी : तुझ्याइतकी नाहीं.

विनोद : काय म्हणतात पाटील वकील ?

**चंदू :** नाटकाची तालीम परवांपासून सुरू होणार आहे असं लिहिलंय्.

**मंदा :** नाटक? कसलं नाटक?

**चंदू :** अग, आपल्या ह्या खादाडवाडींतले सारे वकील नि डॉक्टर मिळून नाटक बसवणार आहेत.

**मनी :** अय्या!

**बंडू :** का ग बय्या?

**मनी :** बंड्या, माझ्या वाटेला जाऊं नकोस हं.

**अजित :** ह्या मुली फार भांडखोर बुवा.

**विनोद :** काय रे चंदू, तुझे बाबा पण नाटकांत काम करणार आहेत का?

**चंदू :** वा! ते तर संभाजीचं काम करणार आहेत.

**मनी :** अय्या! पण त्यांना कुठें आहे दाढी-मिशी?

**बंडू :** तुझ्या वेण्या कापून करतील तयार. म्हणे दाढी-मिशा कुठें आहेत!

**अजित :** ए खरंच रे बंडू, त्या खऱ्या संभाजी राजाला तरी खऱ्या दाढीमिशा होत्या का रे?

**बंडू :** ( गंभीरपणें ) छे रे! तुझ्या शेंडीचे केस कापून चिकटवीत होता रोज सकाळीं.

**बातमीदार :** आँ? काय म्हणतोस? मग ही बातमी छापलीच पाहिजे आमच्या 'पेंद्या' दैनिकांत.

**बंडू :** म्हणजे तुझ्या डोक्याचा चांगलाच गोटा करतील लोक.

**चंदू :** अगदींच कसे रे मूर्ख तुम्ही?

**मनी :** ( अजित व बातमीदार ह्यांच्याकडे बोट दाखवीत ) ह्या दोघांना आपण आपल्या सर्कशींत विदूषक करूं या.

**मंदा :** सर्कस नको, नाटक करूं या.

**चंदू :** आपण रोजच नाटक करतों.

**बंडू :** कधीं पोट दुखण्याचं.

**अजित :** पोट दुखतं म्हटलं कीं आई एरंडेल पाजते, म्हणून मी आपलं डोकं नाहींतर पाय दुखण्याचं नाटक करीत असतों.

**मनी :** खरंच. लहान मुलं नाटक छान करतात.

**मंदा :** आणि मोठीं माणसं फसतात.

**छबी :** फसत नाहींत, मनांत हसतात.

**चंदू :** आज तरी काय सभेचं नाटकच चाललं आहे कीं !

**मनी :** पण ह्या नाटकाचा कंटाळा आला बुवा.

**बंडू :** बुवा नव्हे बाई.

[ मनी बंडूला वेडावून दाखवते. ]

**मंदा :** मला तर ही साडी नकोशी झाली आहे.

**चंदू :** आँ ! म्हणजे ?

**मंदा :** परकर पोलका घालून लपंडाव खेळावासं वाटतं.

**छबी :** इतका वेळ असं एका ठिकाणीं बसून राहायला आपण काय म्हातारी माणसं आहोंत ?

**बंडू :** अग थांबा .... थांबा. अजून खूप ठराव आणायचे आहेत सभेपुढें.

**चंदू :** अजून अजितच्या वडलांचा ठराव मांडायचा आहे.

**मंदा :** म्हणजे ? वडील मांडणार आहेत ?

**चंदू :** नव्हे ग. त्यांनीं अजितला जी वागणूक दिली त्याचा निषेध करणार आहोंत.

**मनी :** मग मी मुळींच बसणार नाहीं इथें. अजितचे वडील किती चांगले आहेत. परवां आमच्या घरीं आले होते तेव्हां त्यांनीं मला चॉकलेट दिलं.

**बंडू :** हेंच तर आमच्या वडील लोकांचं चुकतं. दुसऱ्यांच्या मुलांना चॉकलेट-पेपरमिंट आणि स्वतःच्या मुलांना मात्र धम्मक लाडू.

**मनी :** अरे पण उगाच नाहीं कांहीं धम्मक लाडू मिळत. त्यासाठीं कांहींतरी पराक्रम करावा लागतो.

मंदा : ह्यानें खोडी केली असेल.
अजित : मुळींच नाहीं.
छबी : आणि तरीही मारलं ? उगाचच मारलं ?
मंदा : उगीच मोठीं माणसं कध्धीं मारीत नाहींत. कांहींतरी कारण असेल.
मनी : चोरून खाल्लं असेल.
बंड्र : चोरून खायला तो काय मनी मांजरी आहे ?
मनी : बोका कुठला !

[ दोघें एकमेकांना वेडावून दाखवतात. ]

चंदू : हें पाहा मंडळी ....
छबी : ( पटकन् ) खरंच गडे, आपण नाटक मंडळी काढूं या.
चंदू : ऐका .... गडबड करूं नका. आपले सेक्रेटरी अजितकुमार ह्यांच्या वडलांनीं अख्ख्या भिंतीवर टेलिफोनचे नंबर लिहून ठेवले आहेत ....
बंड्र : पण अजितनें काल शाळेचा अभ्यास भिंतीवर लिहिला तर ....
अजित : ( रडव्या स्वरांत ) आम्हांला मार मिळाला.
मनी : अरे पण कुणींतरी म्हटलं आहे कीं मोठीं माणसं करतात तसं करूं नये, तीं सांगतात तसं वागावं.
बंड्र : शहाणी आहेस !
मनी : आहेंच मुळीं !
चंदू : चला आतां निषेधाचा ठराव मांडूं या.
अजित : हो, पण तो आमच्या वडलांना कळवूं नका.
बंड्र : हत् लेका ! चुकलं, अहो, मग कशाला मांडायचा ठराव ?
मंदा : हें ठरावाचं नाटक आतां पुरे.
छबी : कंटाळा आला.
बातमीदार : माझादेखील हात दुखायला लागला.
मनी : नाक पुसून ?

मंदा : आपण खरं नाटक करूं या.

बंडू : अग पण तें पाहायला येणार कोण ?

मनी : कुणाच्या तरी मदतीसाठीं करूं या, म्हणजे खूप गर्दी होईल.

चंदू : पण आपली मदत घेणार कोण ?

मंदा : ( विचारांत पडून ) आपली मदत घेणार कोऽण ?

मनी : ( टाळी वाजवून ) मी सांगूं ?

बंडू : हं बोला.

मनी : आपण तुझ्या झिपऱ्यासाठीं नाटक करूं या.

अजित : बंडूच्या झिपऱ्या ? म्हणजे ?

मनी : अरे, म्हणजे बंडूचा कुत्रा झिपऱ्या आहे ना, त्याच्यासाठीं आपण नाटक करूं या. त्याच्या गळ्यांत पट्टा घालायला आणि सांखळी आणायला पैसे हवे आहेत.

बंडू : शहाणी आहेस. लोक हसतील कीं.

मनी : हसूं देत. हसतील त्यांचे दांत दिसतील.

चंदू : अग हो, पण मग तूं रडशील त्याची काय वाट ?

बंडू : बाकी चंदू, माझ्याजवळ नाटकासाठीं एक सुंदर गोष्ट आहे.

मंदा : आम्हांला सांग. आत्तां सांग.

बंडू : कालच दादा म्हणाला कीं खराखुरा घडलेला तो प्रसंग नाटकाच्या रूपानें करून दाखवला तर छान होईल.

मंदा : खरंच. तुझा दादा नाटक छान लिहितो.

चंदू : आणि नाटकांत काम पण छान करतो.

मनी : मग तुझ्या दादालाच सांग आपल्यासाठीं नाटक लिहायला.

अजित : मी नाटकांत काम करीन.

मंदा : मी पण करीन.

मनी : मी आईला विचारीन. मी रडलें तर आई नक्कीच परवानगी देईल.

बंडू : हें पाहा, नाटक खरं घडलं आहे ना, मग त्यांत वाटेल तसा फरक कसा बरं करतां येईल ? त्या नाटकांत फक्त एकाच लहान मुलीचं काम आहे.

मंदा : फक्त एकच मुलगी ?

बंडू : हो. आणि दोन मोठीं माणसं. एक बाई आणि एक बुवा.

चंदू : अरे पण तीं दोन मोठीं माणसं कुठून आणायचीं ?

बंडू : आपण सर्वांनीं विनंती केली तर दादा-वहिनी दोघंही काम करतील त्या नाटकांत.

मंदा : मला नाहीं वाटत. तुझा दादा एवढा मोठा प्रसिद्ध लेखक ....

मनी : आणि तो आपल्या नाटकांत काम करणार ?

बंडू : तुला ठाऊक नाहीं. लहान मुलांच्यासाठीं आमचा दादा आणि वहिनी काय वाटेल तें करतील. नाटकांतच काय पण सर्कशींत देखील काम करतील.

मनी : अय्या ! मग करूं याच तें नाटक.

मंदा : ती लहान मुलगी मी होईन.

बंडू : हें बघ, रागावूं नकोस. पण त्या नाटकांत लहान मुलीचं काम तुमच्या शाळेंतल्या प्रभा देशपांडेला द्यायचं.

मनी : अय्या ! प्रभाला ! चौथी 'ब' त आहे ती.

बंडू : हो. तिला द्यायचं लहान मुलीचं काम.

मंदा : अरे, पण तिला नाटकांत काम करतां येईल का ?

मनी : परवां वार्षिक संमेलनाच्या नाटकांत तिला घेतलं होतं. पण मग काढून टाकलं.

बंडू : म्हणूनच तिला आपल्या नाटकांत काम द्यायचं. आणि बरं का मने, आपल्या नाटकाला तुझ्या शाळेंतल्या वेणू, शांता, यमू, वगैरे पुष्कळ मुलींना बोलवायचं.

**मंदा :** इतक्या मुलींचीं नांवं तुला रे कशीं ठाऊक झालीं ?

**मनी :** बराच आहेस कीं !

**अजित :** अरे पण नाटक करायचं कुठें ?

**बंडू :** इथेंच. चंदूच्या घरीं. त्याच्या आई-वडलांची परवानगी मी काढीन.

**चंदू :** आपण नाटकाला तिकीट लावूं या. पहिली रांग सात रुपये, दुसरी रांग....

**बंडू :** ( मध्येंच ) माझं ऐक तूं चंदू. तिकीट न ठेवतां नाटक संपल्यावर आपण सर्वांच्या पुढें ताट फिरवूं या.

**मनी :** इश्श ! हें काय कीर्तन आहे ?

**बंडू :** त्या ताटांत पैशांची रास पडेल रास.

**मनी :** जोंधळ्याची पडते तशी ?

**बंडू :** ( वेडावून दाखवीत ) हो तश्शी !

**मंदा :** त्या पैशांचं काय करायचं ?

**बंडू :** तें आपण नंतर ठरवूं या.

**अजित :** त्या पैशांची आपण नाटक कंपनी काढूं या.

**मनी :** आणि त्या कंपनीचा अजितला मॅनेजर करूं या.

**बातमीदार :** ए. मला सोडशील ना रे फुकट ?

**विनोद :** मला सोडशील ना रे फुकट !

**मनी :** ( सुरावर गाऊं लागते. )

फुकट कांहीं मागूं नये ।
फुकट कांहीं घेऊं नये ।
फुकट नाटक पाहूं नये ।

**बातमीदार :** फुकट दैनिक वाचूं नये ॥

**मंदा :** ए, पुरे आतां तुमचं किंचाळणं. चला, बंडूच्या घरीं जाऊन त्याच्या दादाला आणि वहिनीला नाटकांत काम करण्याबद्दल विनंती करूं या.

अजित : चला – चला लवकर.

चंदू : थांबा हं. आलोंच मी. जरा महाराजला सांगून येतों.

[ चंदू आंत जातो. मुलं-मुली गडबड करूं लागतात. बंडू, अजित, विनोद वगैरे गौरी-गणपतीपुढचा नाच सुरू करतात. मुली हसूं लागतात. मनी–मंदा वगैरे गायला सुरुवात करतात. मुलें साथ करतात. ]

मनी – मंदा : पाँ — पाँ —पाँ

अजित – छबी : पम्— पम् — पम् —

मनी – मंदा : मोटर म्हणते —पाँ — पाँ — पाँ —

बंडू–अजित : गाडी म्हणते — झुक — झुक — झुक —

बंडू : ( आगगाडीची शीळ वाजवतो. )

अजित : ( तबल्याचे ताल देत )

धिं धिं धा गि त्र क तू ना क त्ता धा गी त्र क धी ना

[ नंतर अजित त्रितालचे बोल म्हणूं लागतो. मनी नाचूं लागते. ]

धा धिं धिं धा धा धिं धिं धा धा तिं तिं ता ता धिं धिं धा

[ चंदू बाहेर येतो. ]

चंदू : अरे काय गोंधळ आहे हा ! घर कोसळण्याची वेळ आली. चला चला आतां.

मनी : चला .... चला ....

अजित : हुश्शार .... कदम खोल .... हुश्शार ....

[ सर्व मुलें रांगेंत उभीं राहातात. खिशांतला बाजा काढून बंडू वाजवूं लागतो. मुलें कवाईत करतात. लेफ्ट राईट करीत गोल फिरतात. बातमीदार फोटो घेतो. मुलें शिस्तींत ‘ डावा उजवा ’ करीत बाहेर पडतात. पडदा पडतो. ]

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. ५३५५ नों दि ........
वि. वा. वा. क्र. ........

# अंक दुसरा

[स्थळ : डॉ. देसायांच्या दिवाणखान्याचें स्वरूप खूपच बदलून महिना दीडशें रुपये पगार मिळवणाऱ्या कारकुनाचें घर दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.
वेळ : दुपार टळून गेली आहे. संध्याकाळीं चार साडेचारच्या सुमारास सौ. कमलाबाई जात्यावर दळीत असतांना मधून मधून खालच्या आवाजांत ओव्या म्हणत आहेत.]

निळ्या निळ्या आकाशांत । जशी शुक्राची चांदणी ॥
तशी माझी हिरकणी । प्रभा बाळ ॥ १ ॥
निळ्या निळ्या आकाशांत । शोभे शुभ्रसं चांदणं ॥
कसं मिळेल कोंदण । प्रभावतीला ॥ २ ॥
निळ्या निळ्या आकाशांत ...

[दरवाजा वाजतो. कमलाबाई दचकून मागें पाहातात. दरवाजांत वसंतराव दिसतांच लगबगीनें उठून उभ्या राहातात.]

**कमलाबाई :** इश्श ! केवढी दचकलें मी.

**वसंतराव :** कां ? दचकायला काय झालं ?

**कमलाबाई :** आज इतक्या लवकर कसं येणं झालं घरीं ?

[वसंतराव उत्तर न देतां खुर्चीत बसतात.]

**कमलाबाई :** (त्यांच्याजवळ जात) आपल्याला विचारतें आहें म्हटलं. आज इतक्या लवकर ऑफिसांतून कशी सुटका झाली ? इश्श ! त्या पिठाकडे काय इतकं टक लावून पाहाणं चाललंय् मघापासून ? कसली होतेय् आठवण ? (हसत) धिरड्याची कीं थालीपिठाची ? पण म्हटलं तें

पीठ आहे ज्वारीचं. ( क्षणभर थांबून ) असं काय तें ? बोलायचं नाहीं ? रागावलांत ? बोला ना !

**वसंतराव :** ( विषण्णपणें ) एकंदरींत दुपारीं तुझा हा उद्योग चाललेला असतो तर !

**कमलाबाई :** रोज नाहीं कांहीं दळण काढीत मी. आज कीं नाहीं भारी कंटाळा आला. वेळ कसा तो जातां जाईना. बरं एखादं पुस्तक वाचीन म्हटलं तर तेंही हातीं लागेना. मग काढलं झालं दळण.

**वसंतराव :** खरं सांग कमल, गेल्या सहा महिन्यांत गिरणींत किती वेळां दळण दिलंस तूं ? ( क्षणभर थांबून ) कां ? आतां कां बोलत नाहींस ?

**कमलाबाई :** पण मी म्हणतें, उगाच घरांत बसून करायचं तरी काय माणसानें ? आपण ऑफिसांत. प्रभा शाळेंत. अगदीं कंटाळा येतो दुपारचा. ( हसत ) चांगली शिकलें असतें तर पटकन् तुमच्या ऑफिसांत नोकरी धरून मोकळी झालें असतें.

**वसंतराव :** नोकरी नाहीं, उद्योग नाहीं, म्हणून दळण दळतेस ?

**कमलाबाई :** इतकं नको कांहीं रागवायला. आमचे गणूकाका नेहमीं म्हणायचे, दळणासारखा बायकांना दुसरा व्यायाम नाहीं.

**वसंतराव :** ( विषण्णपणें ) कशाला उगाच ह्या गोष्टी सांगतेस ? व्यायाम, करमणुकीचं साधन म्हणून दळण काढतेस नव्हे ? पहांटे पांच वाजल्यापासून रात्रीं दहा वाजेपर्यंत घरांत राबत असतेस. एवढा व्यायाम पुरा होत नाहीं म्हणून दळावंसं वाटतं. काय, खरं ना ?

**कमलाबाई :** ( ओशाळून ) तसं नव्हे. पण .... पण ....

**वसंतराव :** गिरणींत दळण न देतां तेच चार पैसे वांचविण्यासाठीं चाललेली तुझी ही धडपड .... ही काटकसर मला समजत नाहीं, असं वाटतं होय तुला ?

**कमलाबाई :** इतकं काय बरं मनाला लावून घ्यायचं ? उद्यांपासून जात्याला हात लावणार नाहीं. मग तर झालं ? असल्या क्षुल्लक गोष्टींत पुरुषांनीं लक्ष घालूं नये गडे.

**वसंतराव :** क्षुल्लक गोष्ट ! वरून क्षुल्लक दिसणाऱ्या अशा गोष्टींतच मन अस्वस्थ करण्याची शक्ति दडलेली असते. खरंच सांगतों कमल, पुष्कळदा वाटतं, तूं इतकी चांगली नसतीस तर फार बर झालं असतं. माझ्या गरिबीचा उपहास केला असतास, मला टाकून बोलली असतीस तर माझ्या जिवाचा होणारा हा कोंडमारा तरी चुकला असता.

**कमलाबाई :** ( हसण्याचा प्रयत्न करीत ) हात्तिच्या ! इतकंच ना ? माझ्याकडे लागलं. रुसणं, फुगणं, भांडणं, आदळ आपट करणं आणि वर पुन्हा स्वतःच रडणं ! हं ! आणखी काय काय करायला हवं ? सांगा ना.

[ वसंतराव आणि कमलाबाई हसूं लागतात. ]

**वसंतराव :** अजून प्रभा कशी आली नाहीं शाळेंतून ?

**कमलाबाई :** तिच्या शाळेचा वार्षिक समारंभ आला आहे ना जवळ, त्याची तयारी चालली आहे शाळेंत.

**वसंतराव :** ( उठून कोट खुंटीला लावीत ) मग प्रभानें घेतला आहे वाटतं कशांत भाग ?

**कमलाबाई :** ( आश्चर्यानें ) म्हणजे ? तुम्हांला कांहींच नाहीं सांगितलंन् प्रभानें ? भारीच बाई पोर आंतल्या गांठीची.

**वसंतराव :** तुझीच मुलगी !

**कमलाबाई :** ( हसत ) तरी बरं. सारं जग म्हणतंय् पोर थेट बापाच्या वळणावर गेलीय् म्हणून.

**वसंतराव :** अग तें फक्त दिसण्यापुरतं. स्वभावानें देखील पोर जर माझ्यासारखी साधी, सरळ, मोकळ्या मनाची निघाली असती तर ....

**कमलाबाई :** ( मध्येंच ) तर तर.... तें काय विचारावं ? भोळ्या सांबाचाच अवतार कीं नाहीं !

**वसंतराव :** खरं सांग. माझ्यापेक्षां तू वस्ताद आहेस कीं नाहीं ?

**कमलाबाई :** ( लटक्या रागानें ) चला, पुरे झाला पोरकटपणा.

**वसंतराव :** बरं पण काय ग, प्रभानें कशांत भाग घेतला आहे ? एखादं अभिनय गीत गाऊन दाखवणार असेल आमची नकटी ठमाबाई.

**कमलाबाई :** छे छे. नाटकांत काम करणार आहे ती.

**वसंतराव :** अरे वा ! कुठचं नाटक ?

**कमलाबाई :** रणदुंदुभी नाटकांत तेजस्विनीचं काम करणार आहे ती. भाषण देखील पाठ झालंय् तिचं. ( दाराचा आवाज. प्रभाला पाहातांच वसंतराव पुढें जातात. )

**वसंतराव :** यावं...यावं म्हटलं तेजस्विनीबाईसाहेब. ( प्रभाच्या चेहेऱ्यावर कसलेच भाव दिसत नाहींत. ) ओहो ! रुबाब तर खूप वाढलाय् आजकाल एका मुलीचा. आहे ब्बुवा थाट ! ( प्रभा निमूटपणें आंतल्या खोलींत जाऊं लागते. ) अहो अहो प्रभाताई, जरा इकडे पाहा कीं. ( प्रभा थांबते. ) नाहीं म्हटलं ही भूमिका दिली कुणीं तुम्हांला ? तेजस्विनी अशी नकटी नव्हती कांहीं. ( प्रभा आंतल्या खोलींत निघून जाते. वसंतराव मोठ्यानें हसतात. ) बाकी आपली प्रभा नाटकांत छान दिसेल नाहीं ?

**कमलाबाई :** चालूं द्या लाडक्या लेकीचं कौतुक. मी आपली चहाचं पाहातें. ( कमलाबाई आंत जातात. वसंतराव शीळ घालीत वर्तमानपत्र चाळूं लागतात. आंतल्या खोलींतून कमलाबाईचं बोलणं ऐकूं येतं. )

**कमलाबाई :** ( आंतल्या खोलींत ) अग पण असं रडायला काय झालं ? थट्टेंत कांहीं म्हटलं म्हणून वेड्यासारखं रडत नाहींत कांहीं. चल ... चल बाहेर.

**वसंतराव :** ( बाहेरून मोठ्यानें ) अग पण रडायला झालं काय तिला ?

**कमलाबाई :** ( प्रभाला घेऊन बाहेर येत ) पण मी म्हणतें सारखी कसली मेली थट्टा करायची ? सारखं तिला 'नकटी नकटी' म्हणून चिडवत असतां. नकटी का आहे ती ?

**वसंतराव :** ( हसत ) हात्तिच्या ! नकटी म्हटलं म्हणून का राग आला आमच्या नकट्या .... चुकलों .... उंच नाक्या ठमाबाईना ? बरं बुवा. आतां पुन्हा चुकूनसुद्धा थट्टा करणार नाहीं. मग तर झालं ? हं चला. आतां हसा पाहूं ठमाबाई.

**कमलाबाई :** तिचं नांव ठमा आहे का ? सरळ प्रभा म्हणा.

**वसंतराव :** बरं बुवा. तसं होऊं द्या. अहो प्रभाताई, आतां जरा हसा पाहूं. ( प्रभा जास्तच हुंदके देऊं लागते. वसंतराव तिला जवळ घेतात. ) असं काय बरं प्रभा ! सहज थट्टा केली तुझी. वेडी रे वेडी. चल. पूस पाहूं डोळे.

**प्रभा :** ( हुंदके देत ) दादा .... दादा, तुमच्यावर नाहीं हो रागावलें मी. आज आमच्या मोठ्या बाई .... ( पुन्हा रडूं लागते. )

**वसंतराव :** ( मोठ्यानें हसत ) हत्. वेडाबाई कुठची ! मोठ्या बाई रागावल्या म्हणून रडूं आलं ? अगदींच खुळी. अग हें बघ, मी जेव्हां तुझ्याएवढा होतों ना, तेव्हां आमचे हेडमास्तर मला रोज रागवायचे, उठाबशा काढायला लावायचे. कधीं कधीं तर छड्यांचा खरपूस प्रसाद मिळायचा. पण आपण नाहीं बुवा कधीं रडत घरीं आलों.

**कमलाबाई :** कांहींतरी खोडी केली असेल म्हणून रागावल्या मोठ्या बाई.

**प्रभा :** नाहीं ग आई. मीं कांहीं देखील केलं नाहीं. मी रडत होतें, म्हणून बाई रागावल्या.

**वसंतराव :** ( हसत ) छान ! फार छान ! रडत होतीस म्हणून बाई रागावल्या ; आणि आतां बाई रागावल्या म्हणून पुन्हा रडूं लागलीस. म्हणजे तुझं हें रडणं थांबणार तरी कशानें तें तरी सांग.

**कमलाबाई :** हें बघ प्रभा, हें असं रडलेलं मला मुळींच आवडत नाहीं. ठाऊक आहे ना तुला ?

**प्रभा :** ( रडत ) नाहीं ग आई. माझी कांहीं चूक नव्हती.

**कमलाबाई :** उगाचच रागावायला बाईंना काय वेड लागलंय् ?

**प्रभा :** मुलींनीं मला चिडवलं म्हणून मी रडत होतें तर मोठ्या बाई मलाच रागावल्या.

**कमलाबाई :** छान झालं ; असंच रागावायला हवं.

**वसंतराव :** पण मुलींनीं कां चिडवलं तुला ?

**प्रभा :** ( रडव्या आवाजांत ) बरं का दादा, आम्ही मुली नाटक बसवीत होतों. तर चौथी 'अ' तल्या मुली तिथें आल्या ...

**वसंतराव :** ( मध्येंच ) आणि आमच्या प्रभाताई भाषण चुकल्या .... विसरल्या म्हणून चिडवूं लागल्या ....

**कमलाबाई :** आणि ह्या आमच्या रडूबाई रडूं लागल्या.

**प्रभा :** नाहीं ग आई. माझं भाषण पाठ होतं. साठ्यांची यमू म्हणाली, ही तेजस्विनीपेक्षां मोलकरीण चांगली शोभेल.

**वसंतराव :** ( थट्टेनें ) मोलकरीण म्हटलं म्हणून रडतेस ? मी तर बुवा लहानपणीं नाटकांत कितीतरी वेळां गड्याचं आणि शिपायाचं काम केलं आहे. एकदा तर झाडूवाला झालों होतों.

**प्रभा :** पण दादा, इनामदारांची वेणू म्हणाली, ही भिकारड्याची मुलगी .... धड अंगावर गुंजभर सोनं नाहीं. हिला भिकारीण करा.

**कमलाबाई :** ( समजुतीच्या स्वरांत ) मुली वेड्या आहेत. आपण त्यांच्या बोलण्याकडे लक्षच देऊं नये मुळीं.

**प्रभा :** हो मोठ्या बाई देखील असंच तुझ्यासारखं म्हणाल्या.

**कमलाबाई :** होय ना ? झालं तर मग. पूस पाहूं डोळे.

**प्रभा :** पण मोठ्या बाई म्हणाल्या, कीं उठतां बसतां रडणाऱ्या मुलीला तेजस्विनीचं काम मुळींच शोभणार नाहीं.

**कमलाबाई :** खरं आहे त्यांचं.

**प्रभा :** मी नाहीं नाटकांत काम करणार.

**कमलाबाई :** बरं करूं नकोस. मग तर झालं ?

**प्रभा :** बरं का दादा, सुधा म्हणाली, कानांत डूलदेखील नाहींत.

**कमलाबाई :** प्रभा .... प्रभाबाळ, मीं तुला काय बरं सांगितलं होतं ?

**प्रभा :** नाहीं ग आई, मी दादांच्यापुढें कध्धीं कांहीं सांगत नाहीं. पण आज मुली मला खूप बोलल्या ग. शांता म्हणाली ....

**कमलाबाई :** (मध्येंच) प्रभा .... प्रभा ....

**वसंतराव :** नको अडवूंस तिला. तिनें ह्या गोष्टी उघडपणें बोलून दाखवल्या नाहींत म्हणून का मला कळत नाहींत? सांग, सांग बेटा, काय म्हणाली शांता ?

**प्रभा :** शांता म्हणाली, डूलच काय पण कानांत धड सोन्याची तार देखील नाहीं. दादा, दादा, मला आणून द्या ना हो वेणूसारखे कानांतले डूल.

**कमलाबाई :** (रागाच्या स्वरांत) प्रभा, असला भलता हट्ट करायचा नाहीं.

**वसंतराव :** कां उगाच तिच्यावर रागावतेस ! आजपर्यंत कसला हट्ट म्हणून केला नाहीं पोरीनें. माझ्यासारखा दरिद्री बाप कसली हौस पुरवणार पोरीची ?

**कमलाबाई :** (गहिंवरून) असं काय बरं बोलावं. प्रभेला कळत नाहीं. ती लहान आहे.

**प्रभा :** (त्यांना बिलगून) दादा, दादा, मला नकोत हो डूल. आई, रागावलीस होय माझ्यावर ?

**कमलाबाई :** (तिला जवळ घेत) नाहीं बरं राजा. तुझ्यावर कधीं तरी रागावतें का मी ? पण बाळ, आपण गरीब आहोंत. कुणी कांहीं बोललं तरी मनाला लावून घेऊं नये आपण.

**वसंतराव :** (विषण्णपणें) कशाला हें पोकळ तत्त्वज्ञान शिकवतेस त्या निष्पाप भोळ्या जिवाला? मनाला लावून घेऊं नये! किती सहजपणें बोलून गेलीस! तुला, मला जें साधलं नाहीं तें का तिला साधणार आहे? प्रभा, इकडे ये पाहूं. इकडे ये म्हणतों ना! (प्रभा जवळ जाते.) हं! आधीं हस पाहूं. (प्रभा हसण्याचा प्रयत्न करते.) अं हं! असं नाहीं. अगदीं मनापासून हसलं पाहिजे. हें बघ प्रभे, तुला छान डूल आणून देतों. सगळ्या मुलींनीं नुसतं पाहात राह्यलं पाहिजे. (प्रभा हसते.) हं! आतां कसं खुदकन् हसूं आलं.

**प्रभा :** खरंच? खरंच आणणार दादा डूल? अगदीं खरं?

**वसंतराव :** (हसत) अगदीं खरं.

**प्रभा :** नाहीं तर फसवाल हं!

**वसंतराव :** तुला कधींतरी फसवलं आहे का मीं? रडूबाई कुठची! जा, तोंड धुऊन ये.

**कमलाबाई :** आणि वाटींत पोहे ठेवले आहेत ते पण खा.

[ प्रभा हसत, उड्या मारीत आंत जाते. ]

**कमलाबाई :** उगीच कशाला बरं खोटी आशा लावलीत पोरीला?

**वसंतराव :** खोटी आशा? प्रभेला मी फसवीन असं वाटतं तरी कसं तुला? खरोखरच प्रभेला छानसे डूल आणून द्यायचं ठरवलं आहे मीं. अशी पाहातेस काय वेंधळ्यासारखी? विश्वास नाहीं बसत?

**कमलाबाई :** पण .... पण कसं शक्य आहे तें?

**वसंतराव :** मनांत आणलं कीं सारं शक्य होतं.

**कमलाबाई :** सारीं सोंगं आणतां येतात पण पैशाचं सोंग आणतां येत नाहीं माणसाला.

**वसंतराव :** पण इथें सोंग आणतोय् कोण? आपला सारा व्यवहार साधा .... सरळ.

**कमलाबाई :** कर्ज नाहीं हं काढायचं. माझ्या गळ्याची शपथ आहे.

**वसंतराव :** कर्ज काढून मुलीला दागिने करीन असं वाटलं तरी कसं तुला ? छान ! छान परीक्षा केलीस माझी.

**कमलाबाई :** ( ओशाळून ) तसं नव्हे. पण मग आणणार तरी कुठून पैसे ?

**वसंतराव :** त्याची चौकशी तुला नको. प्रभेला छानसे डूल आणले म्हणजे झालं ना ? ( हसत ) नुसती बघत राहाशील. आहेस कुठें ?

**कमलाबाई :** पण काय करणार आहांत काय तुम्ही ? नाहीं .... नाहीं. मला सांगितल्याखेरीज मी मुळींच सोडणार नाहीं.

**वसंतराव :** मी जें सांगेन तें तूं निमूटपणें ऐकलं पाहिजेस. आहे कबूल ?

**कमलाबाई :** आधीं सांगा तर खरं.

**वसंतराव :** ( घुटमळत ) असं बघ .... हें बघ .... माझं ऑफीस आहे सारं दहा मिनिटांच्या रस्त्यावर. सकाळीं जाऊन संध्याकाळीं परत यायचं. म्हणजे अवघ्या दोन खेपा.

**कमलाबाई :** अस्सं ! सायकल विकण्याचा विचार आला आहे वाटतं डोक्यांत !

**वसंतराव :** बस्स ! बायको असावी तर अशी हुशार .... धूर्त .... ( हसत ) मग काय ? पसंत आहे ना विचार ?

**कमलाबाई :** ( शब्दावर जोर देत ) मुळींच नाहीं. इतकं खोटं बोलवतं तरी कसं ? दहा मिनिटांच्या रस्त्यावर आहे का ऑफीस ? सायकलवरून जायचं म्हटलं तरी लागतात चांगलीं वीस मिनिटं.

**वसंतराव :** तूं कधीं गेली होतीस वाटतं सायकलवर बसून माझ्या ऑफिसांत ?

**कमलाबाई :** जायला कशाला हवं ? तेवढं का कळत नाहीं मला ! दहाला ऑफीस तर घरांतून निघावं लागतं साडेनवाला.

**वसंतराव :** अग पण ऐकून तर घे.

**कमलाबाई :** ( चिडून ) कांहीं ऐकून घेण्याची गरज नाहीं. मी साफ सांगतें, सायकल विकूं देणार नाहीं मी.

**वसंतराव :** खासा न्याय ! सायकलीवर बसणार मी कीं तूं ? आतां मला जर ऑफिसला पायीं जाण्यांत मजा वाटत असेल तर तुझा तरी इतका हट्ट कां ? चालत गेल्यानें चांगला व्यायाम पण होईल मला.

**कमलाबाई :** पुरे पुरे हं. ह्या गप्पा माझ्यापुढें नकोत. व्यायाम म्हणून माझं दळणं कां पटत नाहीं मग ?

**वसंतराव :** ( समजुतीच्या स्वरांत ) हें बघ, जरा शांतपणें ऐकून घे.

**कमलाबाई :** ( हट्टानें ) नाहीं ... नाहीं .... नाहीं. मी त्रिवार सांगतें, मी सायकल विकूं देणार नाहीं.

**वसंतराव :** ( हताशपणें ) एवढ्याचसाठीं सांगणार नव्हतों मी तुला. एकुलत्या एक मुलीची साधी इच्छा पण पूर्ण करतां येऊं नये ह्यालाच म्हणायचं दुर्दैव ! जशी तुझी इच्छा !

**कमलाबाई :** ( समजुतीच्या स्वरांत ) इतकं कसलं वाईट वाटून घ्यायचं ? प्रभेला डूल करूं नका, असं म्हटलं का मीं ?

**वसंतराव :** माझी सारी भिस्त त्या एका सायकलीवर. दुसरं काय राहिलं आहे माझ्याजवळ ? गेल्या वर्षीं माझ्या आजारपणांत तुझ्या हातांतल्या बांगड्या गेल्या. प्रभेच्या आजारीपणांत गळ्यांतली एकदाणी गेली.

**कमलाबाई :** जाऊं देत गडे त्या गोष्टी. ऐकलं का ? माझ्याजवळ जमले आहेत थोडे पैसे.

**वसंतराव :** घरीं दळण दळून शिल्लक टाकलेले पैसे नकोत मला.

**कमलाबाई :** ( हसत ) अहो पण मी तुम्हांला कुठें देतें आहे ? त्या दोन तीन रुपयांत प्रभेसाठीं डूल आणायला सांगतें आहें मी.

**वसंतराव :** तेवढ्या पैशांत कसे येतील डूल ?

**कमलाबाई :** दीड दोन रुपयांना खोटे डूल मिळतात.

**वसंतराव :** (आश्चर्यानें) खोटे? खोटे डूल? खोटे दागिने प्रभेला घालायचे? कमल, तूंच बोलते आहेस ना हें? लग्नानंतर एकदा सहज ताईंनीं तुला खोट्या मोत्याचीं कुडीं घ्यायला सुचवलं, तर तूं काय उत्तर दिलं होतंस? आठवतो का तो दिवस?

**कमलाबाई :** कशी बरं विसरेन मी?

**वसंतराव :** खोट्या दागिन्याला कधींही शिवणार नाहीं असं ताईला निक्षून सांगणारी माझी कमल! केवढा अभिमान वाटला होता त्या वेळीं मला! आणि आज? आज स्वत:च्या हातांनीं स्वत:च्या मुलीच्या अंगावर खोटे दागिने चढवायला निघालीस तूं!

**कमलाबाई :** (अगतिक होऊन) तसं नाहीं.... पण.... पण.... कसं सांगूं तुम्हांला...

**वसंतराव :** (खिन्नपणें) चूक तुझी नाहीं. चूक माझी आहे. हा दोष माझ्या गरिबीचा आहे.

**कमलाबाई :** (गहिंवरून) खोटे डूल आणायला सांगतांना माझ्या मनाला किती यातना झाल्या असतील तें तुम्हांला कळायचं नाहीं. सांगूनही समजायचं नाहीं.

**वसंतराव :** पण खोट्या दागिन्यांचा मोह तुझ्या मनाला पडला तरी कसा?

**कमलाबाई :** माझ्या प्रभेसाठीं. तिच्या समाधानासाठीं. कसं सांगूं तुम्हांला! नाहीं, तुम्हांला तें कळायचं नाहीं. हा दोष माझा नाहीं. आपल्या गरिबीचा नाहीं. हा दोष आहे वात्सल्यप्रेमाचा.

**वसंतराव :** आज वात्सल्यप्रेमाला बळी पडून तूं जर प्रभेला खोटे दागिने दिलेस तर त्याचा परिणाम पुढें काय होईल ह्याचा विचार कर. त्या तसल्या नकली, बेगडी दागिन्यांच्या पायीं ती खोटं बोलायला शिकेल. खरं आणि

खोटं ह्यांत तिला कसलाच फरक वाटणार नाहीं. खोटे दागिने, खोटा झमझैल, खोटा मोठेपणा ...

**कमलाबाई :** ( मध्येंच ) चुकलं .... माझंच चुकलं. नको. माझ्या प्रभेला खोट्या दागिन्याचा स्पर्शही नको व्हायला.

**वसंतराव :** ( आशेनें ) खरं ना हें ? मग आतां तरी सायकल विकण्याची देणार ना परवानगी ?

**कमलाबाई :** एक विचारूं का ?

**वसंतराव :** अवश्य.

**कमलाबाई :** आत्तांच थोड्या वेळापूर्वीं म्हणायचं झालं कीं मी कधीं हट्ट करीत नाहीं, पण आज तें मी खोटं पाडून दाखवणार आहें. माझी एकच इच्छा .... हट्ट म्हणा हवा तर .... पण पुरवायचाच गडे.

**वसंतराव :** ( हसत ) आज्ञा व्हावी बाईसाहेब.

**कमलाबाई :** पाहा हं ! मग नकार द्यायचा नाहीं. माघार घ्यायची नाहीं. आहे कबूल ?

**वसंतराव :** आधीं सांग तर खरं.

**कमलाबाई :** माझी तेवढी मोहनमाळ विकावी गडे. ( क्षणभर थांबून ) इश्श ! असं काय तें एखाद्या पुतळ्यासारखं पाहात राह्यचं माझ्याकडे ? बोला ना !

**वसंतराव :** ( खचलेल्या आवाजांत ) काय बोलूं ? कसं बोलूं ? कमल .... कमल ....

**कमलाबाई :** पण मी म्हणतें, ती पेटींत पडून आहे .... कधीं अंगावर घालायला मन होत नाहीं. विकावी गडे ती मोहनमाळ. हा एवढा एकच हट्ट ....

**वसंतराव :** कसला हा भलता हट्ट ! दुसरं वाटेल तें सांग पण ती मोहनमाळ विकूं देणार नाहीं मी.

२५८२७ अनुक्रम ७१७१ विभाग क्रमांक ५४३ नों. दि. २९।३।६०

**कमलाबाई :** पण ती मोहनमाळ कधींतरी प्रभेलाच द्यायची आहे ना? मग आतांच दिली तर?

**वसंतराव :** पण ती माळ विकायची, मोडायची कल्पनाच माझ्या मनाला सहन होत नाहीं. तुझ्या आईनें सरत्या घटकेला दिलेली ती मोहनमाळ.... तुझ्या आईची स्मृति.... ती आठवण.... नाहीं, कमल, तें शक्य नाहीं.

**कमलाबाई :** ( समजूत घालीत ) जरा शांतपणें विचार करावा गडे. वस्तूचं स्वरूप बदललं म्हणून त्यामागची आठवण का कधीं नाहींशी होते? आज आई असती तर प्रभेसाठीं ती माळ मोडायची तिनें आनंदानें परवानगी दिली असती.

**वसंतराव :** तें सारं खरं पण मन तयार होत नाहीं.

**कमलाबाई :** अं हं. आतां नाहीं मोडता घालायचा. आपल्या हातून वरचेवर का दागिने करणं होणार आहे? आत्तांच करून टाकू या प्रभेसाठीं डूल आणि बांगड्या.

**प्रभा :** ( आंतून बाहेर येत ) आई, आई, कसल्या ग बांगड्या?

**कमलाबाई :** आमच्या प्रभेसाठीं कीं नाहीं सुरेख बांगड्या....

**प्रभा :** ( मध्येंच ) खरंच आई? आमच्या शाळेच्या कोपऱ्यावर तो कासार आहे ना? त्याच्या दुकानांत सुरेख बांगड्या आहेत बघ काचेच्या.

**कमलाबाई :** हत् वेडे. काचेच्या नाहीं कांहीं, सोन्याच्या बांगड्या करायच्या आमच्या प्रभीला.

**प्रभा :** ( आनंदानें ) सोन्याच्या बांगड्या? होय दादा? होऽय?

**वसंतराव :** ( हसत ) कानांत डूल, हातांत बांगड्या, मग काय थाट विचारतां आमच्या नकट्या ठमाबाईचा! ( तिघेंही हसूं लागतात. )

**प्रभा :** दादा, अगदीं लवकर आणा हं डूल आणि बांगड्या. आमच्या शाळेचा वार्षिक समारंभ आहे ना, त्याच्या आधीं आणा. आणाल ना

दादा ? नाहींतर बघा हं. मी रागावेन, रुसेन, फुगेन, आणि शेवटीं रडत बसेन.

**वसंतराव :** अग हो, पण केव्हां आहे तुझ्या शाळेचा समारंभ ?

**प्रभा :** हा शनिवार जाऊन पुढच्या शनिवारीं.

**वसंतराव :** हात्तिच्या ! अजून चांगले दहा बारा दिवस आहेत कीं ! तोंपर्यंत नक्कीच डूल आणि बांगड्या तयार होतील.

**प्रभा :** पाहा हं दादा, विसरूं नका.

[ प्रभा गिरकी घेऊन न ना नि नी च्या बाराखडींत गाऊं लागते. कमलाबाई तिच्याकडे पाहून हसत आंत जातात. मागोमाग वसंतराव पण तिच्या हळूच एक टपली मारून आंत जातात. प्रभा अभिनयासह गाऊं लागते. ]

सोमवारीं पैसे घेउनि जातिल दादा बाजारांत ।
सोनार दाजी पुसेल हसुनी, ‘ आज कुठें हो चुकलां वाट ? ’

मग दादा म्हणतील—

‘ नाहीं चुकलों वाट दाजिबा आलों तुमच्या भेटीला ।
झटपट झटपट डूल बांगड्या करून द्याहो बाळीला ।।

[ प्रभा नाचत गात असतांना पडदा पडतो. ]

# अंक
# तिसरा

[ प्रभा हातांत आरसा घेऊन कानांतले डूल कसे दिसतात ते पाहात आहे. हातांतल्या बांगड्या पण आरशांत पाहाण्याचा प्रयत्न ती करते. आरसा बाजूला ठेवून स्वतःभोंवतीं गोल गिरक्या घेत ती गुणगुणूं लागते. नंतर दरवाजापर्यंत जाते. बाहेर डोकावून पाहात क्षणभर थांबते. नंतर आईला हाक मारीत आंत येते. ]

**प्रभा :** ( हाक मारीत ) आई .... आई ग ....

**कमलाबाई :** ( बाहेर येत ) काय ग प्रभा, काय झालं ?

**प्रभा :** आई, बघ ना ग ! तीन वाजून गेले. आज शनिवार. दादांचं ऑफीस तीनलाच सुटतं. पण अजून दादा आले नाहींत.

**कमलाबाई :** अग पण प्रभे, मुद्दाम का ते उशीर करतील घरीं यायला ?

**प्रभा :** ( रडव्या स्वरांत ) सकाळीं मीं त्यांना बजावून सांगितलं होतं लवकर या म्हणून.

**कमलाबाई :** ( समजूत घालीत ) ऑफीसमध्यें काम निघालं असेल. मग कसं बरं लवकर निघतां येईल ? तूं जा आतां शाळेंत. त्यांची वाट पाहूं नकोस.

**प्रभा :** आम्हीं नाही जा. डूल, बांगड्या दादांना दाखवल्याखेरीज जायचं वाटतं ?

**कमलाबाई :** काल त्यांनीं सोनाराकडे पाहिल्या आहेत. पॉलिश झालं नव्हतं म्हणून आज सोनारानें आणून दिल्या.

**प्रभा :** म्हणून काय झालं? मीं घातलेल्या कुठें पाहिल्या आहेत त्यांनीं? येऊं दे तर खरं दादांना, मी मुळीं बोलणारच नाहीं त्यांच्याशीं.

**कमलाबाई :** आतां जर तूं लवकर गेली नाहींस तर कार्यक्रमाला सुरुवात होईल हं! उगीच उशीर करूं नकोस. परत आल्यावर दाखव त्यांना हा सारा थाटमाट.

**प्रभा :** (फुरंगटून) हो! आणि मी परत येईन तेव्हां दादा फिरायला गेलेले असणार.

**कमलाबाई :** आज त्यांना मुळींच जाऊं देणार नाहीं मी बाहेर. अगदीं दारांत उभं राह्यला सांगतें तुझी वाट पाहात. मग तर झालं?

**प्रभा :** बघ हं! दादांना मुळींच बाहेर जाऊं द्यायचं नाहीं. कार्यक्रम संपला कीं मी लगेच घरीं येतें बघ.

**कमलाबाई :** जा जा आतां लवकर.

[प्रभा जाते. ती नजरेआड होईपर्यंत कमलाबाई दरवाजांत उभ्या राहातात. नंतर आंत येऊन टेबलावरचीं पुस्तकें, वर्तमानपत्रें वगैरे नीट लावतात. वसंतराव आंत येतात.]

**वसंतराव :** (कमलाबाईंना) हें काय? तूं नाहीं गेलीस समारंभाला?

**कमलाबाई :** किती उशीर हा! इतका वेळ पोर वाट पाहात बसली होती. आतां–इतक्यांत गेली.

**वसंतराव :** खूप प्रयत्न केला लवकर निघायचा पण ऐनवेळीं एक काम निघालं. बाकी आज प्रभेचा थाट बघण्यासारखा असेल.

**कमलाबाई :** फार गोड दिसत होती आज प्रभी. कानांतले डूल कसे छान शोभतात तिला.

**वसंतराव :** आतां आल्यावर पाहूं ठमाबाईचा थाट.

**कमलाबाई :** बरं का, आज फिरायला नाहीं जायचं.

**वसंतराव :** छे छे. तिची वाट पाहात अगदीं दारांत उभा राहातों. ( दोघेंही हसतात. ) बरं पण तूं कां नाहीं गेलीस समारंभाला ?

**कमलाबाई :** नाहीं गेलें झालं.

**वसंतराव :** ( खुर्चीत बसत ) गेली नाहींस तें दिसतंच आहे. कां गेली नाहींस हा प्रश्न आहे.

**कमलाबाई :** कंटाळा आला जायचा.

**वसंतराव :** अगदींच अरसिक बुवा तूं. शाळेंतल्या मुलींच्या आया कशा अगदीं गौरीसारख्या नटून थटून समारंभाला गेल्या असतील. ( क्षणभर थांबून ) हं ! आतां कारण लक्षांत आलं.

**कमलाबाई :** ( त्यांचा भावार्थ ओळखून ) म्हटलं गौरीसारखं नटून थटून जाण्यापेक्षां लंकेच्या पार्वतीसारखं जाणं मला अधिक आवडलं असतं.

**वसंतराव :** मग कां गेली नाहींस ?

**कमलाबाई :** ( खुर्चीत बसत ) जायला मन घेईना. प्रभेनें कशांत भाग घेतला असता तर गेलें असतें. प्रभेची केवढी निराशा झाली.

**वसंतराव :** चालायचंच !

**कमलाबाई :** म्हणे अंगावर गुंजभर सोनं नाहीं. अंगावर घातलेल्या दागिन्यांमुळें का माणसाला किंमत येते ? एवढं कसं कळत नाहीं मुलींना ?

**वसंतराव :** अग, त्या तर लहान मुली आहेत. पण मोठीं माणसं तरी काय हेंच करतात.

**कमलाबाई :** चांगला न्याय !

**वसंतराव :** चांगला म्हण कीं वाईट, पण जगाची अशी रीत आहे खरी. माणसाच्या संपत्तीवरून त्याच्या गुणाची किंमत करणारे लोक थोडेथोडके नाहींत जगांत.

**कमलाबाई :** आईच्या आंधळ्या प्रेमानें म्हणत नाहीं मी, पण कुणालाही विचारा. माझी प्रभा सुंदर आहे, हुशार आहे, गुणी आहे ....

**वसंतराव :** हो. पण ती गरिबीचं वाण घेऊन जन्माला आली आहे हें विसरतेस तूं.

[ जवळ जवळ धावतच प्रभा आंत येते. ]

**कमलाबाई :** कोण प्रभा ?

**वसंतराव :** ( आश्चर्यानें ) आणि इतक्या लवकर कशी आलीस ?

**कमलाबाई :** ( तिच्या जवळ जात ) आणि चेहेरा कां ग असा उतरलेला ? ( तिला जवळ घेत ) प्रभा बाळ, काय झालं सांग ना. ( दचकून ) अगबाई ! हें काय ? डूल, बांगड्या काय झाल्या ? प्रभा .... प्रभा .... ( प्रभा रडूं लागते. )

**वसंतराव :** ( उठून जवळ जात ) बेटा, शांत हो, शांत हो. ( तिला जवळ घेत ) काय झालं नीट सांग बरं मला.

**कमलाबाई :** कुणीं भामट्यांनीं तर काढून घेतले नाहींत दागिने ?

**प्रभा :** ( चिडून ) नाहीं. मीं .... मींच ते फेकून दिले.

**वसंतराव :** फेकून दिलेस ?

**कमलाबाई :** तूं फेकून दिलेस ?

**प्रभा :** हो हो, मींच फेकून दिले. ( रडत ) आई .... दादा, तुम्हीं मला कां फसवलंत ?

**वसंतराव :** ( अर्थबोध न होऊन ) फसवलं ?

**प्रभा :** मला ते तसले खोटे दागिने कां दिलेत ?

**कमलाबाई – वसंतराव :** खोटे दागिने ?

**प्रभा :** मीं आतां कध्धीं बोलणार नाहीं तुमच्याशीं. सगळ्या मुलींनीं मला चिडवलं. कां ? कां दिलेत तसले खोटे दागिने ?

**कमलाबाई :** ( मारण्यासाठीं तिच्या अंगावर धावून जात ) कारटे, काय केलंस हें !

**वसंतराव :** ( कमलाबाईंना अडवून ) थांब, थांब कमल. काय हें ! तिला कशाला मारतेस ? तिची काय चूक ?

**कमलाबाई :** ( संतापून ) काय चूक ? अंगावरले दागिने फेकून दिले कारटीनें.

**प्रभा :** मग काय खोटे दागिने अंगावर ठेवू वाटतं ?

**कमलाबाई :** सांगितलं कुणीं तुला ते दागिने खोटे होते म्हणून ?

**प्रभा :** ( चिडून ) कुणीं सांगितलं ? सर्वांनीं सांगितलं. वेणू, शांती, यमू सगळ्या सगळ्या म्हणाल्या कीं ते दागिने खोटे आहेत म्हणून. मंजू म्हणाली, पितळेच्या दागिन्यावर सोन्याचा मुलामा दिला आहे.

**कमलाबाई :** आणि तुला तें सारं खरं वाटलं ?

**प्रभा :** इतकीं सारीं माणसं खोटं बोलतात वाटतं ?

**कमलाबाई :** ( वैतागानें ) कसलीं माणसं हीं ! काय वाईट केलं आहे आम्हीं ह्यांचं, म्हणून हा असा सूड उगवला त्यांनीं आमच्यावर ? नाहीं .... नाहीं सहन होत आतां हें .... नाहीं सहन होत ....

**वसंतराव :** कमल, शांत हो. उगाच असा त्रागा करण्यांत काय अर्थ आहे बरं ?

**कमलाबाई :** उगाच त्रागा ? कांहींच अर्थ नाहीं ह्यांत ? इतकं झालं तरी स्वस्थ बसूं ? नाहीं. ह्या अन्यायाचा जाब विचारल्याखेरीज राहाणार नाहीं मी. अशीच जातें आणि त्या मुलींना विचारतें ....

**वसंतराव :** ( मध्येंच विषण्णपणें हसून ) खुळी आहेस कमल. काय विचारणार आहेस त्या मुलींना ?

**कमलाबाई :** ते दागिने खोटे होते ?

**प्रभा :** ( रडत ) मग काय ते दागिने खरे होते ?

**वसंतराव :** पाहिलंस ? जिथें प्रत्यक्ष तुझ्या मुलीचा तुझ्यावर विश्वास बसत नाहीं तिथें परक्या मुलींचा विश्वास कसा बसेल ?

**कमलाबाई :** ( संतापानें ) नाहीं. मी स्वस्थ बसणार नाहीं. ह्या जगाचा सूड, ह्या अन्यायाचा सूड घेतल्याखेरीज राहाणार नाहीं.

**वसंतराव :** वेडी आहेस कमल ! जगाचा सूड घेणं ही इतकी सोपी गोष्ट वाटली तुला ? जग म्हणजे एक दगडी भिंत. जितक्या जोरानें त्या भिंतीवर हात मारशील तितक्या जोराचा मार तुझ्या हाताला बसेल. त्या भिंतीवर मस्तक आपटून घेतलंस तरी ती दुभंगणार नाहीं कीं तिला तडा जाणार नाहीं. कमल, शांत हो .... मन आवर.

**कमलाबाई :** ( रडत वैतागानें ) जगाकडून अपमान. स्वतःच्या पोटच्या मुलीनेंदेखील विश्वास ठेवूं नये आमच्यावर ! तिला देखील ते दागिने खोटें वाटावेत ....

**प्रभा :** ( आवेगानें ) आई ... दादा ... आई, ते दागिने खरे होते ? खरंच खरे होते ?

**वसंतराव :** ( प्रभेला जवळ घेत शांतपणें ) होय बाळ ! ते दागिने खरे होते. पण जगाला तें ओढून ताणून आणलेलं चंद्रबळ वाटलं. जाऊं दे बाळ ! जें चंद्रबळ ठरलं तें नाहींसं झालं. त्याबद्दल खेद नको. खंत नको.

[ प्रभा वसंतरावांना मिठी मारून रडूं लागते. पडदा पडतो. ]

# अंक चौथा

[ डॉ. देसाई ह्यांचा दिवाखाना. चंदू, बंडू, अजित, मनी, मंदा, वगैरे सभेच्या वेळीं हजर असलेलीं मुलें जमलीं असून इनामदारांची वेणू, शांता, मंजू, वगैरे तीन चार नवीन मुलींची त्यांत भर पडली आहे. मधोमध खुर्चीत प्रभा देशपांडे बसली असून तिच्या बाजूला भिकू जाधव बसला आहे. पडदा वर जातो. प्रथम बंडू भाषण करण्यासाठीं उभा राहातो. ]

**बंडू :** बंधुभगिनींनो, आज आपण इथें कु. प्रभा देशपांडे आणि भिकोबा जाधव ह्या दोघांचा सत्कार करण्यासाठीं जमलों आहोंत. सरस्वती मंदिराचा वृद्ध माळी पांडोबा जाधव ह्यांचा भिकाजी हा मुलगा असून त्याचा आपण प्रथम सत्कार केला पाहिजे. सत्काराचा ठराव माझे मित्र श्रीयुत चंद्रकान्त देसाई सभेपुढें मांडतील. ( बंडू खालीं बसतो. चंदू उठून पुढें येतो. )

**चंदू :** बंधुभगिनींनो, भिकोबा जाधव ह्यांच्या सत्काराचा ठराव मांडतांना माझं अंत:करण आनंदानें आणि अभिमानानें भरून आलं आहे. कु. प्रभा देशपांडे ह्यांनीं फेकून दिलेले दागिने भिकोबांना सापडले आणि त्यांनीं ते तात्काळ प्रभा देशपांडे ह्यांच्या आईवडलांना नेऊन दिले ह्याबद्दल ही सभा त्यांचं अभिनंदन करीत आहे.

[ सर्व मुलें जोरजोरानें टाळ्या वाजवतात. चंदू खालीं बसतो. अजित पुढें येतो. ]

**अजित :** आम्हीं छोट्या मंडळींनीं मोठं नाटक करून दाखवलं त्याबद्दल सर्व लोक आमचं कौतुक करीत आहेत. पण खरं

कौतुक कु. प्रभा देशपांडे ह्यांचं केलं पाहिजे. प्रभाताईंच्या घरीं घडलेली घटना नाटकाच्या स्वरूपांत करून दाखविण्यासाठीं बंडूच्या दादांनीं आणि वहिनींनीं जे श्रम घेतले त्याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहोंत. (टाळ्या) त्याचप्रमाणें आपण सर्व लहानथोर मंडळी आपला बहुमोल वेळ खर्च करून नाटक पाहाण्यासाठीं आलांत त्याबद्दल मी बालवीर-कलापथकातर्फें सर्वांचे आभार मानीत आहें. आतां आपणांपुढें कु. मृणालिनी जोशी ऊर्फ मनी चार शब्द बोलतील ते शांतपणें ऐकून घ्यावे अशी विनंती करून मी खालीं बसतों.

**मनी :** बंधुभगिनींनो, आतां शेवटची गोड कामगिरी माझ्यावर सोपविण्यांत आली आहे. आपल्या 'चंद्रबळ' नाटकाच्या वेळीं जमा झालेले तीनशें रुपये आम्ही कु. प्रभा देशपांडे ह्यांना अर्पण करीत आहोंत. आमच्या ह्या चिमुकल्या देणगीचा प्रभाताईंनीं स्वीकार करावा अशी विनंती आहे.

[ प्रभा थलीचा स्वीकार करते. सर्व मुलें टाळ्या वाजवतात.
मनी पण टाळ्या वाजवीत खालीं बसते. ]

**वेणू :** (डोळे पुशीत उभी राहाते.) मला खूप बोलावंसं वाटतं पण बोलतां येत नाहीं. रडूं येतं. मीं फार मोठा अपराध केला आहे. मीं प्रभेचे खरे दागिने खोटे ठरवले त्यामुळें प्रभाला आणि तिच्या आईवडलांना झालेला त्रास पाहून मला रडूं येत आहे. (डोळे पुसू लागते.) प्रभेनें मला क्षमा करावी. ह्यापुढें मी अशी चूक कधींही करणार नाहीं. (डोळे पुसत खालीं बसते.)

**शांता :** (उठून उभी राहात) वेणूप्रमाणेंच मीं पण प्रभाला फार छळलं आहे. तिचे खरे दागिने खोटे ठरविण्यांत माझ्या हातून फार मोठी चूक झाली आहे. खोटं बोलणारीं, दुसऱ्यांना अकारण त्रास देणारीं मुलं कुणालाच आवडत नाहींत. आतां ह्यापुढें अशी चूक मी कधींही करणार नाहीं. प्रभानें मला थोर मनानें क्षमा करावी. ( खालीं बसते ).

**मंजू :** ( उठून ) ‘ चंद्रबळ ’ नाटक दाखवून आमच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घातल्याबद्दल मी बालवीर-कला-पथकाचे आभार मानीत आहें.

**प्रभा :** ( उठून सर्वांना नम्रपणें नमस्कार करते. ) बंधुभगिनींनो, तुम्हीं सर्वांनीं माझं जें कौतुक केलंत त्याबद्दल मी तुम्हा सर्वांची आभारी आहें. खरं कौतुक भिकोबा जाधव ह्यांचं केलं पाहिजे. माझे दागिने परत आणून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत. फूल नाहीं पण फुलाची पाकळी म्हणून मी ह्या थैलींतले पन्नास रुपये भिकोबा जाधव ह्यांस देत आहें, त्यांचा त्यांनीं स्वीकार करावा.

[ प्रभा थैलींतले पन्नास रुपये देते. भिकू उठून त्यांचा स्वीकार करतो. ]

**भिकू :** बंधुभगिनींनो, वास्तविक पाहातां मीं माझं कर्तव्य केलं आहे, त्याबद्दल अभिनंदन करण्याचं किंवा बक्षीस देण्याचं कांहीं कारण नव्हतं. तरीही सर्वांच्या इच्छेला मान देऊन मी ह्या पैशांचा स्वीकार करीत आहें.

[ सर्वांना नमस्कार करून खालीं बसतो. ]

**प्रभा :** माझ्या मैत्रिणी वेणू, शांता, मंजू, वगैरेंना वाईट वाटत आहे. पण चूक त्यांची नसून माझी आहे. दागिन्यांसाठीं मीं हट्ट धरला नसता तर कुणालाच त्रास झाला नसता. माझ्या हट्टामुळें जें नाटक घडलं तें पाहून आपण सर्वांनीं त्यापासून धडा घ्यावा एवढीच माझी विनंती आहे. उरलेले पैसे मी स्वतःसाठीं खर्च करणार नसून ते सारे आपल्या शाळेच्या वाचनालयासाठीं खर्च करणार आहें. ( जोरानें टाळ्या ) आपण सर्वांनीं वाचनालयाचा फायदा घ्यावा अशी विनंती करून मी रजा घेतें. ( प्रभा खालीं बसते. )

**[अ]जित :** ( उठून ) आजचा आपला कार्यक्रम संपला आहे. आतां [सर्वां]नीं राष्ट्रगीतासाठीं शांतपणें उभं राहावं.

[ सर्वजण शांतपणें उभीं राहून राष्ट्रगीत म्हणतात. पडदा पडतो. ]

५३५५
प्रा. वि.

# नाटक तुम्ही रोजच करतां....

...पण तें कांहीं खरं "नाटक" नव्हे. त्यामुळें वडील माणसं रागावतात मात्र. वडील माणसं म्हणा, मास्तर मंडळी म्हणा, किंवा पाहुणे मंडळी म्हणा खूष व्हायला हवीं असतील तर त्यांना खालीलपैकीं एखादं नाटक करून दाखवा.

## बालवीर

के. गो. पंडित

ह्या नाटुकल्यांतले बालवीर म्हणजे नुसते इस्त्रीच्या कपड्यांतले फाकडे पोशाखी लोक नाहींत. तर खरेखुरे बंधुभावानें निगडित असे निःस्वार्थी कुमार आहेत. चार आणे

## पाहुण्यांची हकालपट्टी

वा. शं. भोंग

आपण पाहुण्यांचा त्रास सहन करतों. तो कां? तर भीड म्हणून. पण जरा डोकें वापरलें तर पाहुण्यांची बोळवणही करतां येते.

सात आणे

## नाटक–नाटक....

स. अ. शुक्ल

खटकेबाज संवाद लिहिण्याबद्दल शुक्ल कवींची ख्याति आहे. हीं छोटीं बहारदार नाटकें तर त्यांनीं मुद्दाम तुमच्यासाठींच लिहिलीं आहेत. एकदां पुस्तक घेतलेंत कीं सगळ्यांच्या उड्याच पडणार ह्याच्यावर! सहा आणे

## सिंहगड

ग. पां. परचुरे

'जिजामाउलीच्या इच्छेपुढें रायाचं लगीन भारी न्हाई' म्हणून कोंडाण्यावर स्वारी करून 'सिंह' पद मिळविणाऱ्या तानाजीची ही नाट्यमय कथा कोणाला आवडणार नाहीं? आठ आणे

केशव [illegible], मुंबई

IRBK-0105355
IRBK-0105355